उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
<u>या कार्यालयाच्या सक्षमीकरणाबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मविसे-१०/२०१५ /प्र.क्र.१६४ /आस्था-३ (अ)

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
मुंबई :- ४०० ००१.
तारीख: ११ फेब्रुवारी, २०१६.

संदर्भ:- वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकिर्ण २०१५/ प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २ जून, २०१५ .

प्रस्तावना :-

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) या पदाकडे विविध योजनांची अंमलबजावणी तसेच समन्वयाचे काम देण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम,१९५८ या अधिनियमांच्या संदर्भातील विविध कामे सोपविण्यात आलेली आहेत. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर राज्य निवडणुक आयोग, वित्त आयोग, ग्रामसभांना जादा अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबतचे सर्व नियंत्रण उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे जिल्हा स्तरावर करीत असतात. यास्तव सदर पदावरील अधिकाऱ्याला सदर पदाचे काम अधिक सक्षमतेने पार पाडता यावे, याकरिता सदर कार्यालयात सहायक गट विकास अधिकारी, गट-ब या संवर्गातील एक अधिकारी उपलब्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार संबंधित जिल्हयामध्ये ज्या पंचायत समितीमध्ये सर्वात कमी ग्राम पंचायतींची संख्या आहे अथवा सदर जिल्हयाच्या लगतच्या जिल्हयातील ज्या पंचायत समितीमध्ये सर्वात कमी ग्राम पंचायतीची संख्या आहे अशा पंचायत समितीमधील सहायक गट विकास अधिकारी, गट-ब चे पद सदर जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) या कार्यालयात स्थानांतरण करण्यासंदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय:-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन दिनांक २ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारानुसार उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) या कार्यालयाचे सक्षमीकरण करण्यासाठी खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ येथे नमूद पंचायत समितीमधील सहायक गट विकास अधिकारी, गट-ब या पदाचे रकाना क्रमांक ३ येथे नमूद जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) या कार्यालयांत स्थनांतरण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	महसूली विभाग	जिल्हा	तालुका पंचायत समिती	ग्रामपंचायत संख्या
१	२	३	४	५
१	नागपूर	नागपूर	रामटेक	४६
२		वर्धा	आष्टी	४२

अ.क्र.	महसूली विभाग	जिल्हा	तालुका पंचायत समिती	ग्रामपंचायत संख्या
१	२	३	४	५
३		चंद्रपूर	बल्लारपूर	१७
४		भंडारा	लाखांदूर	६३
५		गोंदीया	सालेकसा	४३
६		गडचिरोली	मूलचेरा	१७
७	**अमरावती**	अकोला	पातूर	५७
८		अमरावती	तिवसा	४६
९		बुलढाणा	जळगांव जामोद	४७
१०		वाशिम	शेगांव (बुलढाणा)	४७
११		यवतमाळ	बाभुळगाव	६३
१२	**औरंगाबाद**	औरंगाबाद	खुलताबाद	३९
१३		जालना	सोयगांव (औरंगाबाद)	४७
१४		बीड	वडवणी	३६
१५		लातूर	जळकोट	४३
१६		नांदेड	अर्धापूर	३९
१७		उस्मानाबाद	वाशी	४३
१८		परभणी	सोनपेठ	४२
१९		हिंगोली	धर्माबाद (नांदेड)	४५
२०	**नाशिक**	अहमदनगर	श्रीरामपूर	५२
२१		धुळे	भुसावळ (जळगांव)	४०
२२		जळगांव	बोदवड	३९
२३		नाशिक	देवळा	४२
२४		नंदुरबार	अक्राणी	५१
२५	**पुणे**	कोल्हापूर	गगनबावडा	२९
२६		सांगली	पलूस	३४
२७		सातारा	खंडाळा	६५
२८		सोलापूर	उत्तर सोलापूर	३६
२९		पुणे	वेल्हे	७०
३०	**कोकण**	पालघर	तलासरी	२२
३१		रायगड	मुरुड	२४
३२		रत्नागिरी	तळा (रायगड)	२६
३३		सिंधुदुर्ग	वेंगुर्ला	३०
३४		ठाणे	कल्याण	४६

२. वित्त विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २ जून, २०१५ नुसार प्राप्त अधिकारात सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०३१८३८०८०७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2016.02.11 11:56:07 +05'30'

(वि.गिरिराज)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
२. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
३. मा.प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक.
४. विभागीय आयुक्त (सर्व).
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (रामटेक, आष्टी, बल्लारपूर, लाखांदूर, सालेकसा, मूलचेरा, पातूर, तिवसा, जळगांव जामोद, शेगांव, बाभुळगाव, खुलताबाद, सोयगांव, वडवणी , जळकोट, अर्धापूर, वाशी, सोनपेठ, धर्माबाद, श्रीरामपूर, भुसावळ, बोदवड, देवळा, अक्राणी, गगनबावडा, पलूस, खंडाळा, उत्तर सोलापूर, वेल्हे, तलासरी, मुरुड, तळा, वेंगुर्ला आणि कल्याण)
७. सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती (रामटेक, आष्टी, बल्लारपूर, लाखांदूर, सालेकसा, मूलचेरा, पातूर, तिवसा, जळगांव जामोद, शेगांव, बाभुळगाव, खुलताबाद, सोयगांव, वडवणी,जळकोट, अर्धापूर, वाशी, सोनपेठ, धर्माबाद, श्रीरामपूर, भुसावळ, बोदवड, देवळा, अक्राणी, गगनबावडा, पलूस, खंडाळा, उत्तर सोलापूर, वेल्हे, तलासरी, मुरुड, तळा, वेंगुर्ला आणि कल्याण)
८. निवडनस्ती.